नि.फौ.ख.क्र. ३१८/२०२०
शासन वि. स्वप्निल गव्हाणे
**निशाणी क्र. ३८**

***<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा</u>***

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की —

**माझे नांव** : मारूती गुलाब दरेकर,
**वय** : ४८ वर्षे, **धंदा :** शेती
**राहणार** : सणसवाडी, ता.शिरूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी: सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कदम :</u>**

**१.** दिनांक १६/०५/२०२० रोजी मला पोलिसांनी बोलावले नव्हते व माझ्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केलेला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. घटनास्थळ पंचनामा ओळखीकरीता निशाणी ३९ वर आहे. पोलिसांनी माझ्या समक्ष काही जप्त केले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. जप्ती पंचनामा ओळखीकरीता निशाणी ४० वर आहे.

***(सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहाय्य करित नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपासात विचारण्यात येणारी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)***

**<u>उलटतपासणी: सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कदम :</u>**

**२.** दिनांक १५/०५/२०२० व दिनांक १६/०५/२०२० रोजी मी माझ्या घरी होतो. मी वाहतुक मदतनीस म्हणुन काम करतो त्यामुळे माझी व पोलिसाची ओळख आहे. हे मला माहिती नाही की, कोणताही सामान्य माणुस हा कागदपत्रावर वाचुन सही करतो. मी कोणत्याही कागदपत्रावर वाचुन सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०५/२०२० रोजी थोरात नावाच्या पोलिसांनी माझा व दुसरा पंच संदिप गव्हाणे च्या समक्ष घटनास्थळावर जावुन घटनास्थळ पंचनामा तयार केला होता व तो मला वाचुन दाखविला होता व त्यावर मी वाचुन सही केली होती.

**नि.फौ.ख.क्र. ३१८/२०२०**
शासन वि. स्वप्निल गव्हाणे
**निशाणी क्र. ३८**

**३.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६/०५/२०२० रोजी आरोपी स्वप्निल गव्हाणे यांनी माझ्या समक्ष ओबड धोबड दगड, लाकडी काठी व मारूती सुझुकी कंपनीची स्वीफट कार क्रमांक एमएच १२ एस ई ००४७ हजर केले होते व ती पोलिसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनाम्याआधारे जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्याकरीता मी माझ्या समक्ष पंचनामे केलेले नाहीत असे मी खोटे सांगितले.

**उलटतपासः आरोपींतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. जी. ई. दरेकर :**

**४.** नाकारले.

**उलटतपास संपला. फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
2025.09.17 17:38:51 +0530

**(स. द. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे.

ठिकाण : शिरूर.
दिनांक : १७/०९/२०२५.